

MAHARASHTRA ANIMAL & FISHERY SCIENCES UNIVERSITY NAGPUR

माफसू

# यशोगाथा

२०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव





# आदीवासी गटातील महिलांनी मत्स्य संर्वधनातुन साधली आर्थिक उन्नती

राजक्का, बेबी, मैनी, बुज्जी, नंदा, अनिता आणि गिल्लो या आहेत गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यामध्ये असलेल्या आलदांडी गावातील आदिवासी महिला, ज्या पूर्वी केवळ घरकाम व इतर संसारोपयोगी कामात व्यस्त असत. संसाराला हातभार लागावा म्हणून एखादा जोडधंदा करावा या उद्देशाने या महिलांनी महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (उमेद) यांच्या सहाय्याने जय पेरसापेन महिला स्वयंसहायता गटाची सन २०१६-१७ मध्ये स्थापना केली. परंतू उपजिविकेकरीता कोणते कार्य हाती घ्यावे याबाबत या महिला संभ्रमात होत्या. गावालगत असलेली शेती आणि एक गावतलाव एवढीच संसाधने त्यांच्याकडे उपलब्ध होती. अशातच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत  असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर तर्फे राबविण्यात आलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र, गडचिरोली पुरस्कृत ''गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी जनतेचे शास्त्रोक्त मत्स्यव्यवसाय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शाश्वत उपजिविका'' या प्रकल्पा अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (उमेद) यांच्या सल्ल्यानुसार आलदांडी या गावातील जय पेरसापेन महिला स्वयंसहायता गटाची निवड मत्स्य संवर्धन विकास या उपक्रमाकरीता करण्यात आली. या स्वयंसहायता गटातील महिलांना मत्स्य संवर्धन करण्याकरीता प्रोत्साहीत करण्यात आले. गटातील महिलांनी एकत्र येवून ग्रामसभेकडुन ठेका पद्धतीने मत्स्य संवर्धन करण्याकरीता गावतलाव भाडेतत्वावर घेतला. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील डॉ. प्रशांत तेलवेकर आणि श्री. राजीव राठोड यांनी या स्वयंसहायता गटातील महिलांना शास्त्रोक्त मत्स्य संवर्धन कसे करावे याबाबत प्रशिक्षण दिले. तसेच महाविद्यालयातर्फे प्रकल्पा अंतर्गत मत्स्यबीज, कार्प व पंगस मत्स्य प्रजातींच्या बोटूकल्या, माशांच्या वाढीसाठी मत्स्य खाद्य आणि खनिज मिश्रणे पुरविण्यात आली. सदर स्वयंसहायता गटातील महिलांकरीता आलदांडी गावामध्ये मत्स्य संवर्धनावरील कार्यशाळा आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन वेळोवेळी करण्यात आले व महत्वाच्या बाबींवर मार्गदर्शनही करण्यात आले.

तलावाचे व्यवस्थापन, पाणी व मातीच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन आणि माशांचे खाद्य व्यवस्थापन या बाबींमध्ये गटातील महिलांनी वेळोवेळी लक्ष देवून माशांची वाढ कशी चांगल्या रितीने करता येईल व भरपूर उत्पादन कसे मिळवता येईल यासाठी विशेष  प्रयत्न केले. मत्स्य संवर्धनातील एक वर्षाच्या कालावधीनंतर या गटाने २६१३ किग्रॅ. माशांची विक्री केली ज्यामधून रू. २,०९,०००/- इतके उत्पन्न गटास प्राप्त झाले. पहिल्याच प्रयत्नातील या यशानंतर गटातील काही सदस्य जसे श्रीमती राजक्का बंडु आत्राम यांनी आत्मविश्वासाने मत्स्य संवर्धनाचा व्यवसाय स्वतंत्रपणे करण्यास सुरवात केली आहे. त्याकरीता स्वत:च्या शेतात नविन तलावाची निर्मितीसुद्धा त्यांनी केलेली आहे. शेतीसोबतच मत्स्य संवर्धनाचा पर्याय उपजिविकेसाठी उपलब्ध झाल्याबद्दल जय पेरसापेन स्वयंसहायता गटातील महिला सदस्य आनंदी असून येत्या काळामध्ये मत्स्य उत्पादनामध्ये अधिक वाढ करण्याचे त्यांनी ठरवले आहे. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील तज्ञ डॉ. प्रशांत तेलवेकर आणि सहकारी प्राध्यापक सदर स्वयंसहायता गटातील सदस्यांना आधुनिक मत्स्य संवर्धनाकरीता वेळोवळी मार्गदर्शन करीत असतात.

मार्गदर्शक
**डॉ. प्रशांत तेलवेकर व श्री. राजीव राठोड**
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

**जय पेरसापेन महिला स्वयंसहायता गट**
आलदांडी, अहेरी, जि. गडचिरोली
मो. ९४२१७६९९१